INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF HUMANITIES AND INTERDISCIPLINARY STUDIES
( Peer-reviewed, Refereed, Indexed & Open Access Journal )
DOI : 03.2021-11278686 ISSN : 2582-8568 IMPACT FACTOR : 5.71 (SJIF 2021)

# भारतीय स्त्री आणि मानवी हक्क

**संतोष रघुनाथ कोळी**
संशोधक विद्यार्थी
समाजशास्त्र विभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**DOI No.** 03.2021-11278686 **DOI Link ::** https://doi-ds.org/doilink/08.2021-36437312/IRJHIS2108013

**प्रस्तावना :**

मनुष्य जन्माला येताना एक प्राणी म्हणूनच जन्माला येतो. पण तो या जगात इतर प्राण्यांप्रमाणे जगत नाही. तर तो सामाजिक प्राणी म्हणून जगत असतो. या मानवी प्राण्याचे जीवन सामाजिक प्राण्यात रूपांतर होण्याची प्रक्रिया जीवनभर चालूच असते. मानसाला समाजात जगताना काही नियम व कर्तव्ये पार पाडावी लागतात व ती यासाठी पार पाडणे आवश्यक आहे कि कारण समाजात राहत असताना सर्व समाजाचे हित साध्य व्हावे यासाठी त्याच्यामुळे इतर समाजाचे हिताचे नुकसान होऊ नयेत यासाठी प्रत्येकाला स्वत:चा विकास करून घेण्यासाठी काही अधिकार देण्यात आले आहेत. त्यानांच आपला मानव अधिकार म्हणतो.

मानवाला त्याचे जीवन व्यवस्थित जगता यावे त्यांच्यामध्ये कोणता ही भेदभाव असु नये. यासाठी समाजातील प्रत्येक स्त्री व पुरूषाला त्याचा रंग, वंश, त्याची जात, धर्म तो पुरूष आहे का स्त्री असा कोणताही भेद न करता त्याला केवळ एक मनुष्य म्हणून जे काही अधिकार देण्यात आलेले आहेत. त्यालाच मानवी अधिकार असे म्हणता येईल.

भारतीय स्त्री आणि मानवी हक्क यांचा अभ्यास करताना असे लक्षात येते की, जागतीक महिलांच्या बरोबरीने जर विचार केला तर भारतीय स्त्रीयांचा दर्जा, त्यांना मिळणारे अधिकार याची परिस्थिती फारशी चांगली नाही. आजपर्यंत भारतीय महिलांना सर्वच समाजात दुय्यम वागणुक देण्यात आलेली आहे. त्यामुळेच महिलांचा विकास होऊ शकलेला नाही. पूरूष व स्त्री हे एकमेकांना पूरक व एकमेकांवर अवलंबून असलेले घटक आहेत. त्यामुळे सध्या समाजाच्या संपूर्ण विकासासाठी स्त्रीयांच्या विकासाला खास महत्व व प्राधान्य देण्याची गरज आहे.

**मानवी हक्क :**

1) डी.डी. बसे — ''प्रत्येक व्यक्तीला कोणत्याही भेदभावाशिवाय आणि जन्मताच राज्याविरूध्द प्राप्त झालेले अधिकार म्हणजे मानवाधिकार होय.

2) न्या. नागेंद्र सिंग — ''प्रत्येक स्त्री आणि पूरूषाला रंग, लिंग, वंश इ. भेदाशिवाय केवळ मणुष्य म्हणून मिळालेले अधिकार म्हणजे मानवाधिकार होय.''

3) मॅकफरलोन — ''मानवाधिकार हे असे नैतिक अधिकार आहेत की जे प्रत्येक स्त्री आणि पूरूषाला केवळ माणूस या नात्याने प्राप्त झालेले आहेत.''

**उद्दिष्ट्ये :**

1) भारतीय स्त्रीयांच्या समस्या जाणून घेणे.

2) भारतीय महिलांच्या हक्क आणि त्याची होणारी अंमलबजावणी विषयी माहिती घेणे.

3) भारतीय महिलांचे हक्क व आंतरराष्ट्रीय संघटनाचा आढावा घेणे.

**माहिती संकलनाचे स्त्रोत :**

हा संशोधन निबंध सादर करण्यासाठी ग्रंथ सामुग्री, वर्तमान पत्र, इंटरनेट या द्वितीयक माहिती स्त्रोतांचा आधार घेण्यात आला आहे.

**स्त्रीयांचे हक्क आणि आंतरराष्ट्रीय संघटना :**

प्राचीन काळापासूनच भारतीय स्त्रीया सामाजिक व कौटुंबिक अन्यायाचा बळी ठरल्या आहेत. त्यांना अनेक हक्कापासून वंचित ठेवण्यात आले होते. इतकेच नव्हे तर काही समाजात स्त्रीयांना एखाद्या जनावराप्रमाणे वागणूक दिली जात होती. विसाव्या शतकात मात्र या स्त्रियांच्या विषयी दृष्टीकोनात बदल होण्यास सुरवात झाली. युरोपात दुसऱ्या महायुध्दानंतर स्त्रियांना अर्धार्जनासाठी बाहेर पडावे लागते. त्यातुन आर्थिक स्वावलंबन वाढते. स्त्रियांच्या स्थितीत बदल होण्यास हा घटक प्रामुख्याने कारणीभूत ठरला. या स्त्रिया पूरूषांच्या बरोबरीने काम करू लागल्या यामुळे पूरूष प्रधान समाजाच्या हादरे बसून स्त्रियाविषयीच्या दृष्टीकोनात बदल होऊ लागला. व स्त्रियांच्या हक्कांचे रतन करण्यासाठी विविध संघटना निर्माण होऊ लागल्या. या कामी संयुक्त राष्ट्र संघाने पूढाकार घेतला. संयुक्त राष्ट्र संघाच्या प्रयत्नामुळेच या प्रश्नाकडे जागतीक समुदायाचे लक्ष वेधले गेले व संयुक्त राष्ट्र संघात लिंग समानतेचा आग्रह धरण्यात आला व १९४६ मध्ये ''महिला आयोगाची'' स्थापना करण्यात आली.

**स्त्रीयांच्या महत्वाच्या समस्या :**

समाजात स्त्रीयांना मिळणारा निम्न दर्जा हा मानवी विकासात अडथळा निर्माण करत आहे. त्यामुळे स्त्रीयांच्या समस्येचे अध्ययन करणे गरजेचे आहे.

**1) स्त्रीयांचे स्थान :**

पारंपारीक भारतीय समाजात स्त्रीयांना अत्यंत दुय्यम स्थान देण्यात आले होते. भारतीय स्त्रिया सर्व प्रकारच्या सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक व कौटुंबिक अन्यायाच्या बळी ठरल्या होत्या. त्यामुळे त्यांची अवस्था पशुहुनही हीन बनली होती असे म्हटले तरी ते फारसे चुकीचे ठरणार नाही.

**2) बलात्कार :**

आज आपल्या भारतात दर २० मिनीटाला एक बलात्कार होत असुन ही परिस्थिती गंभीर बनत आहे. विनयभंग व बलात्काराच्या घटना घडण्याच्या प्रमाणात ७५ % अपराधी हे त्या पिडीतेच्या कुटुंबातील, नातेवाईक, ओळखीचेच लोक आहेत ही सर्वात गंभीर बाब आहे.

**3) महिला असुरक्षितता :**

आजच्या या युगात जर आपण एखाद्या स्त्रिला प्रश्न केला की, तुम्ही कोणत्या पूरूषी नात्यापासुन सुरक्षित आहात तर आज तिच्याकडे या प्रश्नाचे उत्तर नाही. कारण आज स्त्रीयावर तीचा भाऊ, मामा, काका एवढेच काय तर तिच्या जन्मदात्या बापाकडून सुध्दा बलात्कार होत आहेत. त्यामुळे आजची मुलगी ही कुठल्याही पूरूषापासुन सुरक्षित नाही. बदनामी होईल या भितीने पिडीत स्त्रिया तक्रार करण्यास पुढे येत नाहीत. याचा फायदा गुन्हेगारी प्रवृत्तीचे लोक घेतात.

**4) हुंडा समस्या :**

आजही भारतीय समाजात हुंडा राजरोसपणे घेतला किंवा दिला जातो. त्याला सध्या वरदक्षिणा असे म्हणतात. व त्याचे स्वरूप हे संसारात आवश्यक साहित्य असे आहे. हि पध्दत टिकण्यापाठीमागे समाजाचा मागास दृष्टीकोन हा प्रमुख घटक आहे. हुंड्यला प्राप्त झालेली प्रतिष्ठा हे याचे प्रमुख कारण आहे. यामुळे महिला सतत मानसिक दडपणाखाली जगत आहेत. यातुनच हुंडाबळीचे प्रमाणे मोठ्य प्रमाणावर वाढत आहे.

**5) कौटुंबिक अत्याचार :**

कौटुंबिक अत्याचारात स्त्रिला होणारी शारिरीक इजा हा भाग महत्वाचा मानला जातो. पण त्याचबरोबर मानसिक छळ हा भाग सुध्दा अतिशय महत्वाचा आहे. यामध्ये टोमणे मारणे, अधिक श्रम करावयास लावणे, मारहान करणे, लैंगिक छळ, उपाशी ठेवणे, असे प्रकार सतत घडत असतात व स्त्रीया सुध्दा असे प्रकार निमुटपणे सहन करत असतात.

**स्त्रीयांच्या समस्या व मानवाधिकार :**

भारतीय महिलांच्यावर सतत होणारे अन्याय अत्याचार दुर होण्यासाठी काही अधिकार देण्यात आले व त्या अनुशंगाने काही कायदे सुध्दा करण्यात आले.

**1) घटनात्मक अधिकार :**

१ स्त्री व पूरूष यांच्या भेदभाव न करण्याची हमी — 'कलम १५'

२ सार्वसजीन सेवांमध्ये स्त्रियांना समान अधिकार — 'कलम १६'

३ स्त्री—पूरूषांना समान कामाबद्दल समान वेतन — 'कलम ३९'

४ स्त्रीयांना न्यायासाठी मोफत सहाय्य — 'कलम ३९'

**2) राष्ट्रीय स्त्री सक्षमिकरण धोरण :**

२०१० साली राष्ट्रीय स्त्री सक्षम बनावी यासाठी हे धोरण तयार करण्यात आले याच्या माध्यमातून स्त्रियांना त्यांचा हक्क, अधिकार याविषयी जागृत करून त्यांचा सर्वांगीण विकास साध्य व्हावा यासाठी

प्रयत्न करणे.

**3) राजकिय हक्क :**

संयुक्त राष्ट्र संघाने १९५२ मध्ये महिलांच्या राजकिय हक्काचा ठराव संमत केला. भारतात ७४ व्या घटना दुरूस्तीनुसार महिलांना स्थानिक स्वराज्य संस्थान १/३ जागा राखीव ठेवण्यात आल्या. तर सध्या महिलांना ५० : जागा राखील ठेवण्यासंबंधी विचार सुरू आहे.

**4) हुंडा प्रतिबंधक कायदा :**

१९६१ मध्ये हुंडा प्रतिबंधक कायदा संमत करण्यात आला. १९८६ मध्ये या कायद्यात आणखीन काही सुधारणा करण्यात आल्या. या कायद्यानुसार हुंडा देणे व घेणे गुन्हा ठरवण्यात आला असुन त्यासाठी कठोर शिक्षेची तरतुद करण्यात आली आहे.

**5) कौटुंबिक हिंसाचार कायदा :**

भारतात स्त्रीयांच्यावर त्यांच्या कुंटुबातच खुप मोठ्य प्रमाणावर अन्याय, अत्याचार होत असतात. याला आळा घालण्यासाठी केंद्र शासनाने कौटुंबिक हिंसाचार कायदा २६ ऑक्टोंबर २००६ पासून लागु केला. यामध्ये कुटुंबात स्त्रीला होणाऱ्या शारिरीक व मानसिक त्रास यांचा समावेश करण्यात आला.

**निष्कर्ष :**

1) पारंपारिक भारतीय समाजातील लोकांचा स्त्रीविषयक दृष्टीकोन हा निम्न व गौण स्वरूपाचा आहे.
2) स्त्रीयांना देण्यात आलेल्या मानवाधिकारामुळे त्यांच्या दर्जात सुधारणा होण्यास मदत होत आहे.
3) राज्य घटनेतील असणाऱ्या कायद्यांची अमलबजावणी योग्य प्रकारे होताना दिसत नाही.
4) समाजातील नैतिक मूल्यांचा ऱ्हास, निष्क्रिय न्याय व्यवस्था यामुळे स्त्रीयांचे प्रश्न गंभिर बनत आहेत.

**संदर्भ :**

1) प्रा. व्ही. बी. पाटील (२००९) मानवी हक्क, 'के' सागर प्रकाशन, पुणे

2) पी.एच.परेख (२०१५–१६) ह्युमन राईट्स, युनिवर्सल लॉ प्रकाशन, नवी दिल्ली

3) www.wikipedia.com